लोकसत्ता

# ‘देशाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये विद्यापीठांनी वाटा उचलावा’



कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार डॉ. एस. एस. महाजन यांना प्रदान करण्यात आला. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील.

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** संवाद, सृजनशीलता आणि सहकार्य या त्रिसूत्रीचा अवलंब करून शिक्षण क्षेत्राला भेडसावणाऱ्या मर्यादांवर मात करण्याच्या दिशेने वाटचाल करावी लागेल. एकमेकांसमवेत सहकार्य व साहचर्याची भूमिका घेऊन देशाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये वाटा उचलण्यासाठी विद्यापीठांनी तत्पर राहावे, असे आवाहन सोलापूर येथील पुण्यश्लेक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांना देण्यात आला. बॅ. पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे यांना, तर कै. प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार डॉ. तेजस्विनी दीपक पाटील-डांगे यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. फडणवीस म्हणाल्या, शिक्षणाच्या संदर्भात दर्जावृद्धी महत्त्वाची असून ती शालेय स्तरापासूनच अभिप्रेत आहे. या बाबींचा दिशानिर्देश करण्याची जबाबदारी शिक्षकांवरच आहे. निसर्ग व पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही शिक्षण क्षेत्राने घ्यायला हवी.

पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा गुणवंत प्राचार्य पुरस्कार स्वीकारताना डॉ. मोहन राजमाने. सोबत इतर मान्यवर.

# डॉ. राजमाने यांना गुणवंत प्राचार्य पुरस्कार

## शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी कोल्हापुरात वितरण

**कराड : शहर प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त संलग्न महाविद्यालयातील 'गुणवंत प्राचार्य पुरस्कार २०२१' हा पुरस्कार येथील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांना प्रदान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठामार्फत हा पुरस्कार देण्यात आला.

डॉ. राजमाने यांनी प्राचार्य म्हणून महाविद्यालयात केलेल्या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी आजवर प्रामाणिकपणे सेवा केली. या कालावधीत महाविद्यालंयाबद्दल निष्ठा, कार्यतत्परता, उत्कृष्ट अध्यापन व प्रशासन विविध समित्यावर केलेले प्रतिनिधित्व, तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील बहुमोल योगदान या बाबी विचारात घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राचार्य डॉ. राजमाने २००६ पासून आजअखेर सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. या महाविद्यालयाची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करण्यात मोलाचे योगदान आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी केंद्रीभूत ठेवून त्यांनी महाविद्यालयाचा चेहरा मोहरा बदलला. सुसज्ज व अत्याधुनिक इमारतीबरोबरच पदवी, पदव्युत्तर, एम. फिल, पीएच. डी या पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थांच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम, आधुनिक काळात व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता ओळखून कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना नोकरीबरोबरच व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ए प्लस मानांकन, ३.६३ मिळवणारे पहिले महाविद्यालय असून, आयएसओ प्रमाणित असणारे हे महाविद्यालय २०१९ पासून स्वायत्त करण्यात प्राचार्य डॉ. राजमाने यांचे दूरदृष्टी, योगदान आणि प्रचंड मेहनत आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराने महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, प्रा. डॉ. एन. डी. पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. रवींद्र पवार, रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. व्ही. एस. शिवणकर, सहसचिव डॉ. प्रतिभा गायकवाड, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

21 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अपर्णा राव : शिवाजी विद्यापीठातील परिसंवाद

# महिलांनी नावीन्यपूर्ण उद्योग निवडणे गरजेचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जागतिकीकरणाच्या स्पर्धेत सामाजिक गरजांमध्ये बदल होऊन वाढ होत आहे. या परिस्थितीने नावीन्यपूर्ण उद्योगांना यशस्वी होण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्याचा फायदा घेण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांनी पुढाकार घेऊन नावीन्यपूर्ण उद्योग क्षेत्रात पदार्पण करावे. यासाठी महिला बचत गटांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन आयआयटी मुंबई येथील उद्योजकता अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. अपर्णा राव यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, मध्यवर्ती रोजगार कक्ष व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित परिसंवादात त्यांनी 'महिलांसाठी सूक्ष्म उद्योजकता संधी' या विषयावर मार्गदर्शन केले.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमास आनंदीबाई महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा वैशाली महाडिक प्रमुख उपस्थित होत्या.



**शिवाजी विद्यापीठातील परिसंवादामध्ये डॉ. अपर्णा राव यांनी मार्गदर्शन केले.**

## सक्षमीकरणाचे काम कौतुकास्पद

शिवाजी विद्यापीठ महिलांच्या सक्षमीकरणासाठी करत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी सूक्ष्म उद्योगात अनेक संधी उपलब्ध आहेत. या संधी विद्यापीठाच्या माध्यमातून महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे डॉ. राव यांनी सांगितले.

या परिसंवादात नागपूरच्या शेप फाउंडेशनचे संस्थापक प्रसाद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. ऋचा बाय, सोनाली नगारे, नम्रता पाटील, वैशाली गोसावी चर्चेत सहभागी झाल्या. यावेळी महेश चव्हाण, विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महिला बचत गटांचे प्रतिनिधी, महिला उपस्थित होत्या. डॉ. भारती पाटील, ए. एम गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मिलिंद सावंत, अश्विनी पाटील, किरण शिंदे, लता चौगुले, विद्या कांबळे, वैशाली मदाने, शोभा पाटील यांनी परिसंवादाचे संयोजन केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गजानन राशिनकर यांनी आभार मानले.

पुढारी

# प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांना गुणवंत प्राचार्य पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांना शिवाजी विद्यापीठाचा 'गुणवंत प्राचार्य पुरस्कार २०२१' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

प्राचार्य डॉ. कुंभार यांनी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे. पुरस्काराबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य गवळी, सहसचिव (अर्थ), संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांनी कौतुक केले.

पुढारी

# विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन, विकास केंद्रामार्फत पीजी डिप्लोमाला प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रामार्फत पी.जी.डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट आणि सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टिट्युशन अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू झाले आहेत. पी. जी. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षे आहे. या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे. सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टिट्युशन अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिने असून दहावी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे.

सकाळ

# डी. डी. शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेवाळे यांचे निधन

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २० : येथील डी.. डी. शिंदे (सरकार) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे (वय ६१) यांचे आज मिरज येथील सेवासदन रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी निवृत्त उपप्राचार्य ऊर्मिला शेवाळे यांच्यासह मुलगा, मुलगी, सून, भाऊ असा परिवार आहे. शेवाळे यांच्या निधनाने अभ्यासू व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. उद्या (ता. २१) सकाळी १० वाजता पंचगंगा स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार केले जातील.शेवाळे यांच्यावर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर हृदयविकाराचा झटका आल्याने आठवडाभर मिरजेच्या सेवासदन रुग्णालयात उपचार सुरू होते. आज दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. लाटवडे हे त्यांचे मूळ गाव. सध्या ते हरिओम नगर येथे वास्तव्यास होते. प्राचार्य शेवाळे हे मूळचे इंग्रजीचे प्राध्यापक होते. डी. डी. शिंदे (सरकार) महाविद्यालयाचे प्राचार्य होते, तसेच शिवाजी विद्यापीठाच्या कला व मानव्यशास्त्र विभागाचे अधिष्ठातादेखील होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. प्राचार्य संघटनेचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. विद्यापीठातील इंग्लिश टिचर्स असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

**“ प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे यांच्या निधनाने उच्चशिक्षण क्षेत्रातील उमदे व्यक्तिमत्त्व पडद्याआड गेले. इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होतेच तसेच अध्यापनातही सरस होते. अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून उत्तम काम केले. त्यांच्या नसण्याने शिक्षण क्षेत्राची मोठी हानी झाली.**

**- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ